**CNR NO-MHSO060004222021**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३६/२०२१**

**कृष्णा ढोकळे**

**वि.**

**निवृत्ती सावंत व इतर.**

## नि. क्र. १७ वरील आदेश
## (घोषित दि. १७/११/२०२२)

०१] प्रस्तुतचा अर्ज मयत गैरअर्जदार क्र. १ च्या वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब क्षमापीत करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] गैरअर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध करण्यात आलेला असून तो नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] गैरअर्जदार क्र.१ यांना प्रस्तुत अर्जाची नोटीस पाठविली असता दि.२२/०६/२०२२ रोजी न्यायालयाचे बेलिफ यांनी रिपोर्ट सादर करुन असे कळविले की, गैरअर्जदार क्र. १ यांचा सन २०१५ मध्ये मृत्यु झाल्याबाबत गैरअर्जदार क्र.२ यांनी सांगितले. महत्वाची व नमुद करण्याची बाब म्हणजे गैरअर्जदार क्र. २ हा गैरअर्जदार क्र.१ चा मुलगा असून त्यांना प्रस्तुत अर्जाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर ते स्वतः न्यायालयात हजर झाले परंतु आजपर्यंत गैरअर्जदार क्र.२ यांनी स्वतः न्यायालयाला त्यांचे वडिल सन २०१५ मध्ये मयत झाल्याबाबत कळविलेले नाही.

०४] गैरअर्जदार क्र. १ यांचा सन २०१५ मध्ये मृत्यु झाल्याचे समजल्यानंतर अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे. अर्जदार याने गैरअर्जदारांविरुध्द दिवाणी दावा क्र. ८०/२०१२ असा करारपूर्ततेकरीता दाखल केला होता जो अर्जदाराच्या गैरहजेरीमुळे खारीज झालेला आहे. तो दावा पुन्हा पटलावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. अश्या परिस्थीतीमध्ये गैरअर्जदार क्र. १ यांचा सन २०१५ मृत्यु झाला ही बाब अर्जदारांना पुर्वीपासून माहित होती असे दर्शविणारा कोणताही सकृतदर्शनी पुरावा गैरअर्जदार क्र.२ तर्फे पटलावर आलेला नाही. अश्या परिस्थीतीमध्ये अर्जाची नोटीस गेल्यानंतर आलेल्या बेलिफ रिपोर्टवरुन गैरअर्जदार क्र. १ यांचा मृत्यु झाल्याची बाब अर्जदाराला समजली असे म्हणण्यास वाव आहे.

०५] प्रस्तुत अर्जाचे तथा मुळ अर्जाचे स्वरुप व वरील सर्व परीस्थीती लक्षात घेता अर्जदाराने मयत गैरअर्जदार क्र. १ यांचे वारस पटलावर घेण्याकरीता जाणिवपूर्वक विलंब केला असे म्हणण्यास कोणताही वाव नाही. न्यायदानाच्या दृष्टीने मयत गैरअर्जदार क्र. १ च्या वारसांना पटलावर घेण्याकरीता झालेला विलंब क्षमापित करुन अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित असल्याचे माझे मत झाले आहे, सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ मयत गैरअर्जदार क्र. १ च्या वारसांना पटलावर घेण्याकरीता झालेला विलंब क्षमापीत करण्यात येतो.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2022.11.17 17:32:12 +0530

दि.१७/११/२०२२.

(अमित अ.खंडाळे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पंढरपूर.

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 17.11.2022 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 17.11.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.11.2022 |